| MHNG110005852012 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०३.११.२०१२. |
| | नोंदणी तारीख | : | ०३.११.२०१२ |
| | निकाल तारीख | : | २४.०३.२०२६. |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | १३ ०४ २१ |
| | **निशाणी क्र.** | | <u>५५</u> |

## <u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कुही, जि. नागपूर यांच्या न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी : पी. के. मुटकुळे)

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१४६/२०१२</u>**

१ रामदास किसन गजभिये (मयत वारसा मार्फत) **.....वादी**

१–ए जानकुबाई रामदास गजभिये,
वय–७६ वर्ष, धंदा– शेती,

१–बी श्री. बुध्दभुषण रामदास गजभिये,
वय–५५ वर्ष, धंदा– शेती,
रा. भामेवाडा, ता. कुही, जि. नागपूर.

१–सी विमल रमेश डोंगरे,
वय–४६ वर्ष, धंदा– घरकाम,
रा. पंचशीलनगर, डॉक्टर आंबेडकर मार्ग, नागपूर, ता. व जि. नागपूर.

१–डी पौर्णिमा महेन्द्र मोटघरे,
वय–४४ वर्ष, धंदा– घरकाम,
रा. वडोदा, ता. कामठी, जि. नागपूर.

१–इ युवराज भगवान डोंगरे,
वय–५६ वर्ष, धंदा– शेती,

१–एफ योगिता विकास शामकुवर,
वय–३२ वर्ष, धंदा– घरकाम,

१–जी श्री. राजरतन युवराज डोंगरे,
वय–२७, वर्ष, धंदा– शेती,

१–एच श्री. आनंद युवराज डोंगरे,
वय–२४, वर्ष, धंदा– शेती,
रा. उदासा, ता. उमरेड, जि. नागपूर.

**विरुध्द**

१. श्रीमती कुसुम रामप्रसाद रंगारी, **...प्रतिवादी**
वय– वयस्क, धंदा– शेती,
रा. कडोली, ता. कामठी, जि. नागपूर

२. श्री. किसना रामप्रसाद रंगारी,
रा. प्लॉट क्र.२१२, भांडेवाडी, पारडी,
ता. व जी. नागपूर.

३. श्री. लुबेश चक्रधर मेश्राम,
वय– ३४ वर्ष, धंदा– वकीली,
रा. प्लॉट क्र.२६३, देशपांडे लेआउट,
नागपूर.

**दावा –** घोषणा व निरंतर मनाई हुकुम मिळणेबाबत.

---

| | | |
|---|---|---|
| वादींतर्फे विधीज्ञ | : | श्री. आर. डी. किंदर्ले |
| प्रतिवादींतर्फे विधीज्ञ | : | श्री. एल. सी. मेश्राम |

---

# न्यायनिर्णय

(दिनांक २४.०३.२०२६ रोजी घोषीत)

०१. वादीने प्रस्तुतचा दावा मौजे भामेवाडा ता. कुही, जि. नागपुर येथील सर्वे क्रमांक २०८/१ क्षेत्र १.५२ आर (यापुढे सदर मिळकतीस **"वाद मिळकत"** असे संबोधण्यात येते) या मिळकतीचे प्रतिवादी क्र.०१ ने प्रतिवादी क्र.०२ च्या हक्कात व प्रतिवादी क्र.०२ ने प्रतिवादी क्र.०३ च्या हक्कात नोंदवुन दिलेले खरेदीखत अवैद्य असुन त्यांच्यावर बंधनकारक नाही असे घोषीत होऊन निरंतर ताकीदीचा मनाई हुकुम मिळावा या मागणीसाठी दाखल केला आहे.

## वादीचे थोडक्यात कथन

०२. वादी हा वाद मिळकतीचा मालक असुन त्यापैकी ०.७६ आर क्षेत्रफळ त्याने धनराज जयवंत चव्हान यांच्या कडुन खरेदी केली आहे. प्रतिवादी क्र.०१ चा वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. प्रतिवादी क्र.०१ ने नायब तहसीलदार, कुही यांच्याकडे वाद मिळकतीला तिचे नाव लावण्यात यावे यासाठी अर्ज दिला होता. त्यानुसार नायब तहसीलदार यांनी फेरफार नोंद क्र.३७५ नुसार प्रतिवादी क्र.०१ चे नाव वाद मिळकतीपैकी ०.५७ आर क्षेत्रफळाला लागले. त्यानंतर प्रतिवादी क्र.०१ ने ०.५७ आर क्षेत्राचे प्रतिवादी क्र.०२ च्या हक्कात खरेदीखत करुन दिले व त्यावरुन प्रतिवादी क्र.०२ च्या नावे फेरफार नोंद क्र.३७८ मंजुर झाली. त्यानंतर प्रतिवादी क्र.०२ ने दिनांक ०६.११.२००९ रोजी प्रतिवादी क्र.०३ ला सदर क्षेत्राचे खरेदीखत करुन दिले.

०३. नायब तहसीलदार, कुही यांच्या आदेशाविरुध्द वादीने उप–

विभागीय अधिकारी, उमरेड यांच्याकडे अपील दाखल केले होते. परंतु, ते अपील खारीज झाले. त्यानंतर वादीने अतिरीक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील केले असुन ते प्रलंबीत आहे. वाद मिळकत ही सन १९९३ मध्ये विकत घेतल्यापासुन वादीच्या कब्जे वहिवाटीत आहे. प्रतिवादी हे वादीच्या कब्जे वहीवाटीमध्ये अडीअडथळा निर्माण करतात. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

०४. प्रतिवादींनी निशाणी १७ वर लेखी जबाब दाखल करुन दाव्यातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादींच्या कथनानुसार वाद मिळकत ही भदु बाला गजभिये याची होती. भदु बाला गजभिये यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मिळकतीपैकी प्रत्येकी ०६ एकर शेतजमीन त्यांची मुले तुळशीराम व किसना यांच्या वाट्याला आली. त्यानंतर तुळशीरामचे वारस तुळसाबाई, यमुनाबाई व अनुसयाबाई यांना प्रत्येकी ०२ एकर शेतजमीन आली. तुळसाबाई यांना चार वारस शेवंता, मंजुळा, धनराज व कुसुम हे होते व त्यांना प्रत्येकी ०.१९ आर शेतजमीन आली. कुसुम हिने शेवंता व मंजुळा यांचा हिस्सा खरेदी केल्याने ती ०.५७ आर शेतजमीनीची मालक झाली. धनराज यांना फक्त ०.१९ आर क्षेत्राचा हिस्सा मिळाला होता.

०५. त्यापूर्वी ७/१२ उताऱ्यावर यमुना, धनराज, शेवंता, मंजुळा, कुसुम, अनुसया व गया यांची नावे होती. यमुनाबाई हिने हिस्सा विकल्यामुळे तिचे नाव कमी झाले. कुसुम यांनी शेवंता व मंजुळा यांचा हिस्सा खरेदी केल्यामुळे त्यांची नावे कमी झाली. कुसुम यांनी ७/१२ उतारा काढला असता त्यांच्या लक्षात आले की त्यांचे नाव ७/१२ उताऱ्यावरुन कमी झाले आहे. त्यानंतर तहसीलदार यांच्या आदेशाने तिचे नाव ७/१२ उताऱ्यावर लागले. कुसुम यांनी तिच्या मालकीची ०.५७ आर शेतजमीन प्रतिवादी

क्र.०२ किसना यांना खरेदीखताद्वारे विक्री केली. धनराज याने त्याच्या हिस्स्याची ०.१९ आर शेतजमीन मुळ वादी रामदास यांना विक्री केली होती. परंतु त्याने जास्त क्षेत्रफळाचे बेकायदेशीर खरेदीखत करुन घेतले. प्रतिवादी क्र.०१ व ०२ हे मालक असल्यामुळे प्रतिवादी क्र.०३ ने त्यांच्याकडुन वाद मिळकत विकत घेतली. सबब, प्रतिवादींनी दावा खारीज करण्यात यावा अशी मागणी केली.

०६. वादी व प्रतिवादी यांच्या परस्परविरोधी कथनावरुन माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र.२० वर मुद्दे निश्चीत केले. सदर मुद्दे यापुढे नमुद करुन त्यावर मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादी असे सिध्द करतो काय की वाद मिळकतीवर त्याची मालकी व कब्जा आहे ? | नाही. |
| ०२. | वादी असे सिध्द करतो काय की प्रतिवादी क्र.०१ ने दिनांक २४.०१.२००८ रोजी प्रतिवादी क्र.०२ च्या हक्कात करुन दिलेले खरेदीखत हे अवैद्य असुन त्याच्यावर बंधनकारक नाही ? | नाही. |
| ०३. | वादी असे सिध्द करतो काय की प्रतिवादी क्र.०२ ने दिनांक ०६.११.२००९ रोजी प्रतिवादी क्र.०३ च्या हक्कात करुन दिलेले खरेदीखत हे अवैद्य असुन त्याच्यावर बंधनकारक नाही ? | नाही. |
| ०४. | वादी असे सिध्द करतो काय की प्रतिवादी क्र.०१ | |

| | | |
|---|---|---|
| | ते ०३ अथवा त्यापैकी कोणीही त्याच्या वाद मिळकतीवरील शांततामय कब्जे वहीवाटीस अडथळा निर्माण केला ? | नाही. |
| ०५ | वादी असे सिध्द करतो काय की प्रतिवादी क्र.०१ ते ०३ अथवा त्यापैकी कोणीही वाद मिळकत हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात आहेत ? | नाही. |
| ०६. | वादी हा मागणी केल्याप्रमाणे घोषणा होऊन मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही. |
| ०७. | वादी हा मागणी केल्याप्रमाणे निरंतर मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहे आय ? | नाही. |
| ०८. | काय आदेश व हुकूमनामा ? | दावा खारीज करण्यात येतो. |

## वादींचा तोंडी पुरावा

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | साक्षीदार क्र. | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | रामदास किसन गजभिये | ०१ | २७ |
| ०२. | राजु भगवान शेंडे | ०२ | ३७ |
| ०३. | रामदास सुर्यभान वानखेडे | ०३ | ४४ |

## प्रतिवादींचा तोंडी पुरावा

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | साक्षीदार क्र. | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | लुबेश चक्रधर मेश्राम | ०१ | ४६ |

## वादींचा कागदोपत्री पुरावा

| अनु. क्र. | कागदपत्राचे विवरण | निशाणी क्र. |
|---|---|---|
| ०१. | दिनांक १४.०६.१९९३ चे विक्रीपत्र | ३०-ए |
| ०२ | दिनांक ०६.११.२००९ चे विक्रीपत्र | ३०-बी |
| ०३ | फेरफार नोंदवही | ३५ |
| ०४. | गाव नमुना ७/१२ | ३६ |
| ०५. | खरेदीखत | ४३ |
| ०६. | उपविभागीय अधिकारी, उमरेड यांची दिनांक २७.०२.२००९ ची आदेशाची प्रमाणीत प्रत | ४९ |
| ०७. | नायब तहसीलदार, कुही दिनांक २६.०७.२०१० ची प्रमाणीत प्रत | ५० |
| ०८. | उपविभागीय अधिकारी, उमरेड यांची दिनांक १४.०७.२०११ ची आदेशाची प्रमाणीत प्रत | ५१ |

०७. वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.डी. किंदर्ले व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एल.सी. मेश्राम यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ करीता** :

०८. सदर मुद्दा सिध्द करण्याकरीता वादीने स्वतःची व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवीली आहे. वादीच्या कथनानुसार तो वाद मिळकतीचा मालक असुन त्यापैकी ०.७६ आर शेतजमीन त्याने प्रतिवादीक्र.०१ चा भाऊ धनराज चव्हान याच्याकडुन खरेदी केली आहे.

त्यानुसार त्याचा वाद मिळकतीवर मालकी कब्जा आहे. फेरफार नोंद क्र.०५ नि.क्र.३५ वरुन असे स्पष्ट होते की वादीने धनराज जयवंत चव्हान याचे कडुन गट क्र.१०८/१ क्षेत्रफळ १.५२ आर खेरेदी केले होते. परंतु खरेदीखत नि.क्र.४३ वरुन असे दिसुन येते की शेतजमीन गट क्र.१०८/१ क्षेत्रफळ १.५२ आर पैकी ०.७६ आर क्षेत्रफळ वादीने धनराज चव्हान याच्याकडुन विकत घेतली आहे. सदर फेरफार क्र.०५ हा खरेदीखताच्या विसंगत आहे. उलटतपासात वादीने मान्य केले की धनराज चव्हान याच्याकडे ०.७६ आर शेतजमीन होती हे दाखवण्यासाठी त्याने कोणताही उतारा दाखल केला नाही. त्याचप्रमाणे त्याने दाखल केलेल्या खरेदीखतासोबत त्या मिळकतीचा उतारा जोडला नाही. पुढे त्याने कबुली दिली की दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर त्याच्या नावाने जी शेतजमीन आहे ती त्याच्याकडे कशी आली हे दाव्यात नमुद नाही.

०९. अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की वादी हा १.५२ हे. आर चा शेतजमीनीचा मालक असल्याबाबत त्याने मालकीचा कोणताही दस्त दाखल केलेला नाही. उलटतपासात वादीने त्याबाबत स्पष्ट कबुली दिली आहे. अभिलेखावरील दाखल खरेदीखत नि.क्र.३० सोबत जोडलेल्या ७/१२ उताऱ्यावर वादीच्या नावे ०.७५ आर क्षेत्रफळ असल्याचे स्पष्ट होते. परंतु, सदर क्षेत्रफळ वादीच्या नावे कसे लागले याबाबत वादीने कोणताही पुरावा सादर केला नाही. त्याचप्रमाणे वादीचा वाद मिळकतीवर कब्जा असल्याबाबात त्याच्या तोंडी कथनाव्यतिरीक्त कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे वादीचा वाद मिळकतीवर मालकी व कब्जा आहे ही बाब सिध्द होत नाही. करीता मी, मुद्या क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

## मुद्दा क्र.०२ व ०३ करीता :-

१०. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.०१ यास कोणताही अधिकार नसतांना त्याने प्रतिवादी क्र.०२ च्या हक्कात वाद मिळकतीचे खरेदीखत करुन दिले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.०२ याने प्रतिवादी क्र.०३ ला वादमिळकतीचे खरेदीखत करुन दिले असुन ते बेकायदेशीर आहे आणि त्याच्यावर बंधनकारक नाही. नमुद खरेदीखत हे बेकायदेशीर व बनावट आहेत हे सिध्द करण्याची संपूर्ण जबाबदारी ही वादीवर आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वाद मिळकतीपैकी ०.१९ आर क्षेत्रफळ प्रतिवादी क्र.०१ यांना वाटणीमध्ये मिळाले होते व त्यांनी शेवंता व मंजुळा यांना वाटणीत मिळालेले प्रत्येकी ०.१९ आर क्षेत्र खरेदी केले होते. अशाप्रकारे प्रतिवादी क्र.०१ कुसुम ही ०.५७ आर क्षेत्राची मालक झाली होती. प्रतिवादी क्र.०१ चा भाऊ धनराज याला वाटणीमध्ये ०.१९ आर क्षेत्रफळ मिळाले होते. परंतु, प्रतिवादी यांनी कुसुम, तिची बहिण व भाऊ यांना वाटणीमध्ये नमुद क्षेत्रफळ मिळाले होते हे दर्शविण्याकरीता वाटणीपत्र अथवा वाटणीची अन्य दस्त दाखल केला नाही. असे असले तरी नमुद खरेदीखत हे बेकायदेशीर आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी पूर्णपणे वादींवर आहे.

११. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.०१ ही ०.५७ आर क्षेत्राची मालक होती. वादीने उप विभागीय अधिकारी, उमरेड यांचेकडे अपील क्र.६१/आर.टी.एस.५९/२००७-२००८ दाखल केले होते. सदर अपिलामध्ये नायब तहसीलदार यांचा आदेश रद्द होऊन फेरचौकशीचे आदेश झाला. त्यानंतर फेरचौकशी करुन नायब तहसीलदार, कुही यांनी मामला क्र.११/आर.टी.एस.५९/२००९-२०१० मध्ये आदेश नि.क्र.५० पारीत केला. सदर आदेशावरुन स्पष्ट होते की प्रतिवादी क्र.०१ ही ०.५७ आर

क्षेत्रफळाची मालक आहे. त्यानंतर वादीने उपविभागीय अधिकारी, उमरेड यांच्याकडे अपिल क्र.०१/आर.टी.एस–५९/२०१०–२०११ दाखल केले होते. सदर अपिल मधील आदेश नि.क्र.५१ वरुन असे स्पष्ट होते की प्रतिवादी क्र.०१ ही ०.५७ आर क्षेत्रफळाची मालक असुन धनराज चव्हाण यांना फक्त ०.१९ आर हिस्सा मिळाला होता. उप–विभागीय अधिकरी, उमरेड यांनी वादीचे अपील फेटाळले आहे. प्रतिवादी क्र.०१ ही ०.५७ आर क्षेत्रफळाची मालक असल्याबाबत नायब तहसीलदार, कुही व उप विभागीय अधिकारी, उमरेड यांनी चौकशीअंती निकाल दिला आहे.

१२. खरेदीखत क्र.१४१/२००८ नि.क्र.३०अ नुसार प्रतिवादी क्र.०१ हिने तिचा मुलगा किसना प्रतिवादी क्र.०२ याला तिच्या मालकीचे क्षेत्रफळ ०.५७ विक्री केले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.०२ याने सदरची मिळकत प्रतिवादी क्र.०३ यास खरेदीखत क्र.१४२३/२००९ नि.क्र.३०ब अन्वये विक्री केली आहे. नमुद खरेदीखतासोबत दाखल केलेला ७/१२ उतारा पाहिले असता त्यामध्ये प्रतिवादी क्र.०१ हिच्या नावे ०.५७ आर क्षेत्रफळ आहे. वादी याने त्याच्या उलटतपासात स्पष्ट कबुली दिली की प्रतिवादी क्र.०१ हिच्याकडे ०.५७ आर जमीन आली होती. त्याचप्रमाणे शेवंता, मंजुळा, कुसुम आणि धनराज यांना प्रत्येकी ०.१९ आर जमीन आली होती ही बाब वादीने मान्य केली आहे. प्रतिवादी क्र.०१ ही वाद मिळकत गट क्र.२०८/१ पैकी ०.५७ आर क्षेत्रफळाची मालक असल्यामुळे तिला खरेदीखत करुन देण्याचा पुर्ण अधिकार आहे. अशाप्रकारे प्रतिवादी क्र.०१ हिने तिच्या मालकीचे क्षेत्र प्रतिवादी क्र.०२ याला व त्यानंतर प्रतिवादी क्र.०२ ने प्रतिवादी क्र.०३ याला विक्री केलेल्या क्षेत्रफाळाचे खरेदीखत हे कायदेशीर आहे.

१३. धनराज चव्हाण याने वादीच्या हक्कात वाद मिळकतीपैकी ०.७६ आर क्षेत्रफळाचे विक्रीपत्र क्र.२०३/१९९३ नि.क्र.४३ करुन दिले आहे. सदर खरेदीखत नोंदवुन देतांना धनराज याच्या नावे ०.७६ आर क्षेत्रफळ होते हे दर्शविणारा कोणताही पुरावा वादीने सादर केला नाही. याउलट वादीने उलटतपासात कबुली दिली की तुळजाबाई यांची मुले, शेवंता, मंजुळा, कुसुम व धनराज यांना प्रत्येकी ०.१९ आर जमीन आली होती. त्यामुळे धनराज यास वादीच्या हक्कात ०.७६ आर क्षेत्रफळाचे खरेदीखत करुन देण्याचा कोणताही अधिकार राहात नाही. धनराज याच्याकडे ०.७६ आर जमीन होती हे दर्शविण्यासाठी वादीने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन असे स्पष्ट होते की प्रतिवादी क्र.०१ ही वाद मिळकतीपैकी ०.५७ आर क्षेत्रफळाची मालक होती. सदर क्षेत्रफळ त्यांनी खरेदीखताआधारे प्रतिवादी क्र.०२ व त्यानंतर प्रतिवादी क्र.०२ याने प्रतिवादी क्र.०३ यांना विक्री केले आहे. त्यामुळे सदरचे खरेदीखत हे कायदेशीर आहेत. वादीने नमुद खरेदीखत हे अवैद्य असल्याबाबत कोणताही पुरावा सादर केला नाही. परिणामी सदरचे खरेदीखत हे कायदेशीर असुन वादीवर बंधनकारक आहेत. सबब मी, मुद्दा क्र.०२ व ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र.०४ करीता** :-

१४. वादीच्या कथनानुसार त्याने वादमिळकत खरेदी केल्यापासुन त्यावर त्याचा कब्जा आहे. प्रतिवादी हे त्याच्या कब्जास अडथळा निर्माण करतात. वादीच्या म्हणण्यानुसार तो १.५२ हे. आर क्षेत्रफळाचा मालक असुन त्यापैकी त्याने ०.७६ आर शेतजमीन धनराज चव्हाण याच्याकडुन विकत घेतली आहे. अभिलेखावरील ७/१२ उतारा नि.क्र.३६ चे

अवलोकन केले असता त्यावर वादीच्या नावे ०.९५ आर क्षेत्रफळ नमुद आहे. यापूर्वी नमुद केल्याप्रमाणे वादी हा धनराज चव्हाण याच्याकडुन ०.७६ आर शेतजमीन विकत घेतल्याची बाब सिध्द करु शकला नाही. वादमिळकतीवर वादीचा कब्जा आहे हे दर्शविण्यासाठी त्याने रामराव सा.क्र.०३ याची साक्ष नोंदवीली आहे. साक्षीदाराच्या कथनानुसार वादीने धनराज चव्हाण याच्याकडुन ०.७६ आर शेतजमीन खरेदी केली होती व वादीचा त्या शेतजमीनीवर कब्जा आहे. परंतु नमुद क्षेत्रफळावर वादीचा कब्जा असल्याबाबत त्याने महसुल अभिलेखातील कोणतीही नोंद दाखल केली नाही. महत्वाची बाब म्हणजे वादीने ०.७६ आर शेतजमीन धनराज चव्हाण याच्याकडुन खरेदी केली होती ही बाब सिध्द झालेली नाही. त्यामुळे केवळ तोंडी पुराव्या आधारे वादीचा कब्जा सिध्द होत नाही. अशाप्रकारे वादी हा त्याचा वाद मिळकतीवर कब्जा असल्याची बाब सिध्द करु शकला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या कब्जास अडथळा निर्माण केला याबाबत प्रश्न उद्भवत नाही. सबब मी, मुद्दा क्र.०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.०५ करीता** :–

१५. वादीच्या म्हणण्यानुसार त्यास अशी भिती आहे की प्रतिवादी हे वाद मिळकत त्रयस्त इसमांना हस्तांतर करतील. प्रतिवादी क्र.०१ ही वाद मिळकतीपैकी ०.५७ आर ची कायदेशीर मालक होती व तिने ती मिळकत प्रतिवादी क्र.०२ याला व त्यांनतर प्रतिवादी क्र.०२ याने प्रतिवादी क्र.०३ याला विक्री केली आहे आणि सदरचे खरेदीखत हे कायदेशीर आहेत ही बाब यापूर्वी नमुद केल्याप्रमाणे सिध्द झाली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०३ यास ती मिळकत हस्तांतर करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. याउलट वादी हा

नमुद मिळकतीवर मालकी हक्क व कब्जा प्रस्थापीत करु शकला नाही. प्रतिवादी हे वाद मिळकत कोणाला विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे अथवा त्यांनी त्याबाबत करारनामा केला किंवा कसे याबाबत वादीने कोणतेही कथन केले नाही अथवा पुरावा सादर केला नाही. सबब मी, मुद्दा क्र.०५ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

<u>**मुद्दा क्र.०६ व ०७ करीता**</u> :–

१६. अभिलेखावरील पुराव्यावरुन प्रतिवादी क्र.०१ हिने प्रतिवादी क्र.०२ यांना करुन दिलेले व प्रतिवादी क्र.०२ याने प्रतिवादी क्र.०३ यांना करुन दिलेले खरेदीखत हे कायदेशीर आहेत हे सिध्द झाले आहे. त्यामुळे वादी हा सदरचे खरेदीखत बेकायदेशीर असुन त्याच्यावर बंधनकारक नाही या मागणीस पात्र नाही. त्याचप्रमाणे वादी हा वाद मिळकतीपैकी ०.७६ आर क्षेत्रफळावर त्याची मालकी व कब्जा सिध्द करु शकला नाही. त्यामुळे तो प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. सबब, मुद्दा क्र.०६ व ०७ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

<u>**मुद्दा क्र.०८ करीता**</u> :–

१७. वादी हा वाद मिळकतीपैकी ०.७६ आर शेतजमीनीचा मालक आहे ही बाब सिध्द करु शकला नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.०१ हिने प्रतिवादी क्र.०२ व त्यांनतर प्रतिवादी क्र.०२ याने प्रतिवादी क्र.०३ याला नोंदवुन दिलेले ०.५७ आर क्षेत्रफळाचे खरेदीखत बेकायदेशीर आहे ही बाब वादीने सिध्द केली नाही. त्यामुळे वादी हा मागणी केल्याप्रमाणे घोषणा होऊन मिळण्यास व निरंतर ताकीदीचा मनाई हुकुम मिळण्यास पात्र ठरत नाही. परिणामी, वादीचा दावा खारीज करणे न्यायसंगत आहे. सबब मी, मुद्दा

क्र.०८ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

०१. वादीचा दावा खारीज करण्यात येतो.

०२. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

PARASRAM KUNDLIK MUTKULE
Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.03.25 17:19:14 +0530

दिनांक–२४.०३.२०२३

**(पी. के. मुटकुळे)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कुही, जि. नागपूर.

## –प्रमाणपत्र–

मी, खात्रीपूर्वक कथन करते की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – सौ. व्ही. आर. सावरकर
न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कुही, जि.नागपूर.